www.rajdand.com
सातारा/पुणे, गुरुवार
18.01.2024
पृष्ठ : ४ । मुल्य : ४ । मार्गशीर्ष कृ.२७
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासार्हतेची

# आता लढाई सु. कोर्टात

## सुप्रिम कोर्टाने याचिका स्वीकारली; २२ जानेवारीला सुनावणी

**मुंबई : शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणी उद्धव ठाकरे गटाच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या त्रिसदस्यीय पीठापुढे सोमवारी, २२ जानेवारी रोजी सुनावणी होणार आहे. ठाकरे गटाचे वकील कपिल सिबल यांनी लवकरात लवकर सुनावणी घेण्याची विनंती केली होती.**



शिंदे गटातील आमदारांना अपात्र ठरविण्यासाठीच्या याचिका विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी फेटाळून लावल्या आहेत. या निर्णयाविरोधात ठाकरे गटाचे पक्षप्रतोद सुनील प्रभू यांनी सर्वोच्च याचिका सादर केली आहे. याप्रकरणी तातडीने काही आदेश देण्याची आवश्यकता असल्यामुळे लवकरात लवकर सुनावणी घेण्यात यावी, अशी विनंती ॲड. सिबल यांनी सरन्यायाधीशांच्या पीठाला केली होती. ती न्यायालयाने मान्य केली. नार्वेकर यांनी ठाकरे आणि शिंदे गटाने एकमेकांविरोधात दाखल केलेल्या ३४ याचिका फेटाळून लावल्या आहेत.

### नार्वेकर यांच्या निर्णयास स्थगितीची मागणी

केंद्रीय निवडणूक आयोगाकडे शिवसेनेच्या १९९९ च्या पक्षघटनेची प्रत सादर करण्यात आल्याने आणि त्यानंतरच्या घटनादुरुस्तीची काहीच नोंद आयोगाकडे नसल्याने नार्वेकर यांनी त्याघटनेतील तरतुदीनुसार निर्णय दिला आहे. खरी शिवसेना शिंदे यांची असल्याचा निकालही नार्वेकर यांनी दिला होता. निर्णयास निर्णयास त्वरित स्थगिती देण्याची मागणी ठाकरे गटाची याचिकेद्वारे केली आहे.

## मुंबई उच्च न्यायालयाची ठाकरे गट आणि राहुल नार्वेकर यांना नोटीस

राहुल नार्वेकर यांनी ठाकरे गटाच्या १४ आमदारांना पात्र ठरवल्याने शिंदे गटाने ठाकरे यांना शह देण्याकरिता मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. नार्वेकर यांनी ठाकरे गटाच्या १४ आमदारांना पात्र ठरविले होते. मात्र या आमदारांनी पक्षादेशाचा भंग केला असल्याने त्यांना अपात्र ठरविण्यात यावे, अशी मागणी करणारी याचिका शिंदे गटाचे प्रतोद भरत गोगावले यांनी केली. या याचिकेवर सुनावणी घेताना मुंबई उच्च न्यायालयाने ठाकरे गट आणि राहुल नार्वेकर यांना नोटीस बजावली आहे. येत्या ८ फेब्रुवारीपर्यंत उत्तर सादर करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

न्यायमूर्ती गिरीश एस कुलकर्णी आणि न्यायमूर्ती फिरदोश पी पुनीवाला यांच्या खंडपीठासमोर शिंदे गटाच्या याचिकेवर सुनावणी झाली. सर्वोच्च न्यायालय या प्रकरणाची सुनावणी करत आहे का, अशी विचारणाही खंडपीठाने याचिकाकर्त्यांना केली.

याचिकाकर्त्यांचे ज्येष्ठ वकील अनिल सिंग यांनी याचिकेत प्रतिवादींना नोटीस बजावण्याची मागणी केली. अध्यक्षांचा निर्णय मनमानी, घटनाबाह्य आणि बेकायदेशीर आहे. तसंच, ठाकरे गटाच्या आमदारांनी स्वेच्छेने पक्षाचं सदस्यत्व सोडलं हे सिद्ध करण्यात नार्वेकर अयशस्वी ठरले. अध्यक्षांनी रेकॉर्डवरील पुराव्यांचाही विचार केला नाही. त्यामुळे ठाकरे गटाच्या आमदारांना अपात्र न करण्याचा आदेश कायद्याने चुकीचा होता. त्यामुळे हा आदेश रद्द करावा, अशी मागणी करणारी याचिका शिंदे गटाचे प्रतोद भरत गोगावले यांनी मुंबई उच्च न्यायालयात केली होती.

शिवसेना पक्ष कोणाचा यासह ठाकरे व शिंदे गटाच्या आमदारांच्या पात्रता-अपात्रतेबाबत विधानसभा अध्यक्षांनी गेल्याच आठवड्यात निर्णय दिला. विधानसभा अध्यक्ष नार्वेकर यांनी शिवसेनेवर शिंदे गटाने केलेला दावा अध्यक्षांनी योग्य ठरवला. त्याच वेळी, शिंदे आणि ठाकरे गटाचे सर्व आमदार पात्र असल्याचेही निर्वाळा दिला होता.

एकीकडे या निर्णयाविरोधात ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली असताना दुसरीकडे, शिंदे गटाचे आमदार आणि प्रतोद गोगावले यांनी उच्च न्यायालयात धाव घेऊन ठाकरे गटाच्या सर्व १४ आमदारांना अपात्र ठरवण्याची मागणी केली आहे. गोगावले यांनी या १४ आमदारांविरोधात स्वतंत्र याचिका केली आहे.

ठाकरे गटाच्या सदस्यांनी पक्षादेशाचे (व्हीप) उल्लंघन केले नसून स्वेच्छेने शिवसेना या राजकीय पक्षाचे सदस्यत्व सोडले आहे. सदस्यत्व सोडण्यासह, सरकार स्थापनेवेळी ठाकरे गटाच्या सदस्यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या बरोबरीने शिवसेनेच्या विरोधात मतदान केले आणि सत्ताधारी सरकार पाडण्याचा प्रयत्न केला. मात्र, हा मुद्दा विचारात घेण्यास विधानसभा अध्यक्ष अपयशी ठरले, असा दावा गोगावले यांनी याचिकेत केला आहे.

आपण दिलेली कारणे ही केवळ आरोप अथवा दावे असल्याचा निष्कर्ष अध्यक्षांच्या आदेशातून निघतो. परंतु, हा निष्कर्ष अयोग्य आणि बेकायदेशीर असून तो गुणवत्तेवर टिकणारा नाही, असा दावाही गोगावले यांनी ठाकरे अध्यक्षांचा निर्णय बेकायदा ठरवून रद्द करण्याची मागणी करताना केली आहे.

# १२ वीच्या विद्यार्थ्यांना भागाकार जमेना!

## असरच्या अहवालात शैक्षणिक अधोगतीचेच चित्र

**मुंबई :** देशभरातील शैक्षणिक स्थिती मांडणाऱ्या ह्यअसरह्ण या सर्वेक्षणातून यंदाही राज्यातील शैक्षणिक दुदर्शावताराचे दर्शन घडले आहे. बारावीच्या स्तराचे शिक्षण घेणे अपेक्षित असलेल्या साधारण ६८ टक्के विद्यार्थ्यांना भागाकार करता आलेला नाही.

दुसरीच्या स्तराचा मराठीतील परिच्छेद जवळपास २१ टक्के विद्यार्थ्यांना वाचता आला नाही. इंग्रजीतील सोपी वाक्ये सुमारे ३९ टक्के विद्यार्थ्यांना वाचता आली नाहीत. शैक्षणिक प्रवाह, विद्यार्थ्यांचा शाखा निवडीसाठीचा कल याचीही पाहणी करण्यात आली असून कौशल्य विकास अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांचे प्राधान्य नसल्याचे दिसते आहे.

प्रथम एज्युकेशन फाऊंडेशनह्णने देशभर केलेल्या ॲन्युअल स्टेटस ऑफ एज्युकेशन (असर) या सर्वेक्षणाचे निष्कर्ष बुधवारी जाहीर केले. यंदा राज्यातील फक्त नांदेड जिल्ह्यातच हे सर्वेक्षण करण्यात आले होते. ह्यअसरह्णचा यंदाचा १५ वा अहवाल आहे. गेल्या १५ अहवालांप्रमाणेच राज्याच्या शैक्षणिक अधोगतीचे दाखले यंदाच्या अहवालानेही दिले आहेत. यंदा १४ ते १८ वर्षे या वयोगटातील म्हणजे साधारण आठवी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी अवगत केलेली भाषिक, गणिती कौशल्ये, त्याचे प्राथमिक पातळीवर उपयोजन अशा बाबींचे १२०० घरांना भेट देऊन सर्वेक्षण करण्यात आले.

या सर्वेक्षणातील निष्कर्षांनुसार १४ ते १६ म्हणजे आठवी ते दहावीच्या ७६.४ टक्के, तर १७ ते १८ म्हणजे अकरावी, बारावीतील ७९ टक्के विद्यार्थ्यांना दुसरीच्या विद्यार्थ्यांना वाचता येणे अपेक्षित असलेला मराठी परिच्छेद वाचता आला. विद्यार्थ्यांना वाचनास दिलेला उतारा पुढीलप्रमाणे होता : दिनूच्या गावातून एक सुंदर नदी वाहते. गावातील लोक तिथे रोज गुरे चरायला घेऊन जातात. एके दिवशी शहरातील काही लोक नदीकाठी फिरायला आले..

तीन अंकी संख्येला एक अंकी संख्येने भाग देण्याचे गणित जमलेले आठवी ते दहावीतील अवघे ३५.७ टक्के, तर अकरावी, बारावीचे ३२.१ टक्के विद्यार्थी आढळले.

८८३ भागिले ७ किंवा ५३७ भागिले ४ अशा स्वरूपाची उदाहरणे विद्यार्थ्यांना सोडवण्यास देण्यात आली होती.

इंग्रजीतील सोपी वाक्ये, प्रश्न वाचू शकणाऱ्या आठवी ते दहावीतील विद्यार्थ्यांचे प्रमाण ५०.६ टक्के तर अकरावी, बारावीतील विदयार्थ्यांचे प्रमाण ६०.८ टक्के.

मराठी परिच्छेद वाचू शकणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण इंग्रजी आणि गणिती कौशल्यांच्या तुलनेत चांगले असले तरी वाचलेल्या मजकुराचा अर्थ समजून उपयोजन करता येणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण फारसे नाही. वाचता येणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी आठवी ते दहावीच्या जवळपास ४० टक्के तर अकरावी, बारावीच्या ३० टक्के विद्यार्थ्यांना ह्यओआरएसह्णचा वापर कसा करावा याबाबत दिलेल्या सूचना वाचून त्यावर विचारण्यात आलेल्या प्रश्नांची उत्तरे देता आली नाहीत. पट्टीवर ठेवलेल्या किल्लीची लांबी किती, वजन, हिशेब, वेळेचे गणित करता न येणाऱ्या आठवी ते बारावीतील विद्यार्थ्यांचे प्रमाणही ५० टक्क्यांहून अधिक आहे.

या सर्वेक्षणानुसार १४ ते १६ वयोगटातील १५.१ टक्के तर १७ ते १८ वयोगटातील ४२.६ टक्के विद्यार्थ्यांकडे स्वतःचा स्मार्टफोन आहे. स्वतःचा फोन नसला तरी स्मार्टफोन वापरू शकणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण अनुक्रमे ९०.४ आणि ९५.६ टक्के असल्याचे दिसते. त्यातील ९० टक्क्यांपेक्षा अधिक विद्यार्थी समाज माध्यमांचा वापर करतात. मात्र खात्यातील माहिती गोपनीय ठेवणे, एखाद्या खात्याबद्दल तक्रार करणे किंवा ब्लॉक करणे, पासवर्ड बदलणे याबाबत जागरूक असलेल्या आठवी ते दहावीतील विद्यार्थ्यांचे प्रमाण २६ ते ३८ टक्के, तर अकरावी, बारावीतील विद्यार्थ्यांचे प्रमाण ५० ते ५८ टक्के असल्याचे दिसते आहे.

# गॅस गळतीमुळे झालेल्या स्फोटात सहाजण जखमी; कराडमध्ये खळबळ

**कराड:** कराड नगरपालिकेच्या समोरील रस्त्यावर बुधवार पेठ परिसरात आज बुधवारी (दि. १७) रात्री सव्वानऊ वाजण्याच्या सुमारास एका घरात स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडरला गळती लागून झालेल्या मोठ्या स्फोटात सहा जण जखमी झाले. या स्फोटाने एकच गोंधळ उडताना, परिसरातील लोक घटनास्थळी धावले.

याबाबत घटनास्थळावरून मिळालेली अधिक माहिती अशी, की या गॅस सिलिंडर स्फोटाचा फटका लगतच्या घरांनाही बसून, एकूण सहा जण जखमी झाले आहेत. त्यात तीन महिलांचा समावेश आहे. अनिता मोरे (वय ५८), संगीता भोसले (वय ५०), मालन भोसले (वय ४०), किरण बडेकर (वय ५०), अमोल भोसले (वय ३२), उमेश दुबळे (वय ३५ सर्व राहणार बुधवार पेठ, कराड) हे या स्फोटात जखमी झाले आहेत. जखमींवर तातडीने वेणुताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू करण्यात आले आहेत. दरम्यान, कराड नगरपालिकेचा अग्निशामक बंब आणि पोलीसही घटनास्थळी दाखल झाले. पोलीस अग्निशमन दलाचे जवान, पोलीस व स्थानिकांनी जखमींना येथील वेणूताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालयात हलवले. येथे जखमींवर उपचार सुरू आहेत.



### पुनः पुन्हा गॅस सिलिंडर गळती

अलीकडेच शहराच्या मुजावर कॉलनीत शरीफ मुल्ला यांच्या घरात सकाळच्या प्रहरी झालेल्या स्फोटात मुल्ला कुटुंबातील चार आणि शेजारील असे नऊजण जखमी होताना, सहा वाहनांचे व शेजारील घरांचे नुकसान झाले. पुढे उपचारा दरम्यान, मुल्ला कुटुंबातील सर्व म्हणजेच शरीफ मुल्ला, त्यांची पत्नी व दोन मुलांचे निधन झाले होते. या घटनेबद्दल अनेक तर्कवितर्क लढवले गेले. असे असताना आता बुधवार पेठेत गॅस सिलिंडर गळतीनेच मोठा स्फोट झाल्यानें आश्चर्य व्यक्त होत असून, कराडमधील गॅस सिलिंडरला गळती लागतीच कशी असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# राज्यातली रुग्णसंख्या ४५१ वर पोहोचली

**पुणे :** राज्यात करोना विषाणूचा नवीन उपप्रकार जेएन.१ च्या सर्वाधिक रुग्णांची नोंद पुण्यात झाली आहे. राज्यातील एकूण रुग्णसंख्या ४५१ झाली असून, त्यातील तब्बल १८९ रुग्ण पुण्यातील आहेत. पुण्यात करोनामुळे मागील २४ तासांत एका रुग्णाच्या मृत्यूची नोंद झाली आहे, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य विभागाने दिली आहे.

राज्यात जेएन.१ या उपप्रकाराचा पहिला रुग्ण सिंधुदुर्ग जिल्ह्यात आढळला होता. त्यानंतर पुण्यासह ठाण्यामध्ये काही रुग्ण सापडले होते. राज्यातील जेएन.१ ची एकूण रुग्णसंख्या मंगळवारी २५० होती. त्यात बुधवारी एकाच दिवसांत २०१ रुग्णांची भर पडली आहे. पुण्यात बुधवारी जेएन.१ च्या ३९ रुग्णांची नोंद झाली. त्यामुळे पुण्यातील एकूण रुग्णसंख्या १८९ झाली असून, राज्यातील जेएन.१च्या एकूण रुग्णांपैकी ४० टक्के पुण्यात आहेत. त्याखालोखाल ठाणे ८९, मुंबई ३७, छत्रपती संभाजीनगर ३१, नागपूर ३०, रायगड १३, सोलापूर ९, अमरावती ९, सांगली ७, कोल्हापूर ७, रत्नागिरी ५ , जळगाव ४, हिंगोली ४, अहमदनगर ३, बीड ३, नांदेड २, नाशिक २, धाराशिव २, अकोला १, सातारा १, सिंधुदुर्ग १, यवतमाळ १ आणि नंदुरबार १ अशी रुग्णसंख्या आहे.

राज्यात मागील २४ तासांत करोनाच्या ८१ नवीन रुग्णांचे निदान झाले आहे. त्याच वेळी ९७ रुग्ण रुग्णालयातून बरे होऊन घरी गेले आहेत. राज्यात रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९८.१८ टक्के असून, मृत्युदर १.८१ टक्के आहे. राज्यात मागील २४ तासांत १२ हजार २६९ चाचण्या झाल्या. राज्यातील पॉझिटिव्हिटी दर ०.६६ टक्के आहे, अशी माहिती आरोग्य सहसंचालक डॉ. बी. आर. पवार यांनी दिली.राज्यातील करोनाची सक्रिय रुग्णसंख्या ५७९ आहे.

# आजपासून शाकंभरी नवरात्र उत्सव सुरू

**धाराशिव:** महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी देवीच्या शाकंभरी नवरात्र उत्सवास गुरूवार, १८ जानेवारी रोजी घटस्थापनेने प्रारंभ होणार आहे. नवरात्रापूर्वीच्या मंचकी निद्रेस दशर्वेळा अमावस्येच्या दिवशी प्रारंभ झाला होता. गुरूवारी पहाटे देवीची मंचकी निद्रा संपून सिंहासनावर देवीच्या मूतीची पुन्हा प्रतिष्ठापना आणि घटस्थापना होणार आहे. २५ जानेवारी रोजी घटोत्थापन व २६ जानेवारी रोजी महाप्रसाद आणि रात्रीच्या छबिना मिरवणुकीने नवरात्रौत्सवाची सांगता होणार आहे.

तुळजाभवानी देवीचा शाकंभरी नवरात्रोत्सव १८ ते २६ जानेवारी २०२४ या कालावधीत पार पडणार आहे. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम होणार असल्याची माहिती मंदिर संस्थानच्या वतीने देण्यात आली. गुरुवार, ११ जानेवारी रोजी तुळजाभवानीच्या मंचकीनिद्रेने शाकंभरी नवरात्र उत्सवास प्रारंभ होणार आहे. या दिवशी सायंकाळची अभिषेक पूजा झाल्यानंतर रात्री नऊ वाजता तुळजाभवानीच्या मंचकीनिद्रेस प्रारंभ होणार आहे. यानंतर गुरूवार, १८ जानेवारी रोजी ही मंचकीनिद्रा संपून पहाटे तुळजाभवानीची सिंहासनावर पूर्ववत प्रतिष्ठापना केली जाईल. सकाळच्या अभिषेक पूजेनंतर यजमान भोपे पुजारी यांच्या हस्ते शाकंभरीची घटस्थापना व ब्राह्मण वृंदास अनुष्ठानची वणी देण्यात येणार आहे. १९ जानेवारी रोजी सकाळची व रात्रीची अभिषेक पूजा झाल्यानंतर रात्री देवीचा छबिना तर २० जानेवारी रोजी सकाळी देवीची नित्योपचार अभिषेक पूजा झाल्यानंतर विशेष अलंकार महापूजा मांडण्यात येणार आहे. यानंतर २४ जानेवारीपर्यंत दररोज वेगवेगळ्या विशेष अलंकार महापूजा मांडल्या जातील. २४ जानेवारी रोजी अलंकार महापूजेनंतर होमावर अग्निस्थापना होऊन होमहवनास प्रारंभ करण्यात येणार आहे. २५ जानेवारी रोजी शाकंभरी पौणिर्मेनिमित्त शाकांभरीचे घटोत्थापन, नित्योपचार अलंकार महापूजा, रात्री छबिना व महंताचा जोगवा तसेच २६ जानेवारी रोजी देवीची नित्योपचार अभिषेक अलंकार पूजा होऊन अन्नदान महाप्रसाद व रात्रीच्या छबिन्याने शाकंभरी नवरात्रोत्सवाची सांगता होईल. यंदा शाकंभरीचे यजमानपद हे भोपे पुजारी यांच्याकडे असणार आहे.

# दावोसमध्ये महाराष्ट्राने केले 3.53 लाख कोटींचे विक्रमी सामंजस्य करार

## दोन लाख रोजगार निर्माण होणार; मुख्यमंत्र्यांची माहिती

**स्वित्झर्लंड :** स्वित्झर्लंडमधील दावोसमध्ये सुरु असलेल्या जागतिक आर्थिक परिषदेत दोन दिवसांत महाराष्ट्राने ३ लाख १० हजार ८५० कोटीचे सामंजस्य करार केले असून गुरुवारी (१८ जानेवारी) ४२ हजार ८२५ कोटींचे करार होणार आहेत. अशा रितीने ३ लाख ५३ हजार ६७५ लाख कोटींचे विक्रमी सामंजस्य करार करत असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी (१७ जानेवारी) समाजमाध्यमांतून दिली. याव्यतिरिक्त १ लाख कोटींच्या गुंतवणुकीत उद्योगांनी स्वारस्य दाखवले असल्याने राज्यावर जागतिक उद्योग आणि गुंतवणूकदारांचा विश्वास वाढला आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी गुंतवणूकदारांचे आभार मानले आहेत. या करारांमुळे राज्यात दोन लाख रोजगारांची निमिती होईल असंही मुख्यमंत्री म्हणाले.



हे सामंजस्य करार केवळ कागदावर न राहता त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी जलदगतीने करण्याचा आमचा भर आहे. गेल्या वषी दावोस येथे झालेल्या करारांपेक्षा यंदा अधिक गुंतवणुकीचे सामंजस्य करार होत आहेत, असे सांगतानाच उद्योगपूरक, कुशल मनुष्यबळ आणि झटपट निर्णय घेणारे लोकाभिमुख राज्य अशी महाराष्ट्राची प्रतिमा जगभरात असल्याचे याठिकाणी जाणवल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

दावोस परिषदेच्या पहिल्याच दिवशी म्हणजे जानेवारी रोजी सहा उद्योगांसमवेत एक लाख दोन हजार कोटींच्या गुंतवणुकीचे करार करण्यात आले. त्यातून २६ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. १७ जानेवारी रोजी आठ उद्योगांशी दोन लाख आठ हजार ८५० कोटींचे गुंतवणूक करार करण्यात आले. त्यातून एक लाख ५१ हजार ९०० रोजगार निमिती होईल. गुरुवारी, सहा उद्योगांशी ४२ हजार ८२५ कोटींचे करार होत असून त्यातून १३ हजार रोजगार निर्माण होतील, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

आयनॉक्स एअर प्रोडक्ट झ्र २५ हजार कोटी (५ हजार रोजगार), बी. सी. जिंदाल ४१ हजार कोटी (५ हजार रोजगार), जेएसडब्ल्यू स्टील झ्र २५ हजार कोटी (१५ हजार रोजगार), एबी इन बेव्ह झ्र ६०० कोटी (१५० रोजगार), गोदरेज एग्रोव्हेट झ्र १००० कोटी (६५० रोजगार) अमेरिका स्थित डेटा कंपनी झ्र १० हजार कोटी (२०० रोजगार)

अदानी ग्रुप झ्र ५० हजार कोटी (५०० रोजगार), स्विस इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स झ्र १,१५८ कोटी (५०० रोजगार), इंडियन ज्वेलरी पार्क झ्र ५० हजार कोटी (१ लाख रोजगार), वेब वर्क्स ५ हजार कोटी (१०० रोजगार), लॉजिस्टिकमधील इंडोस्पेस, इएसआर, केएसएच, प्रगती, यांची मिळून ३,५०० कोटी (१५ हजार रोजगार), नैसर्गिक संसाधानातील कॉन्गलोमिरेट कंपनी २० हजार कोटी (४ हजार रोजगार)

महाप्रीतने हरित उर्जा प्रकल्पांसाठी ५६ हजार कोटींचे करार केले.

# रुग्णवाहिकेतून गांजा विक्री टोळीचा पर्दाफाश

## अंमली पदार्थ विरोधी पथकाची कारवाई

**पिंपरी- चिंचवड :** पिंपरी-चिंचवडच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने गांजाची तस्करी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. वेगवेगळ्या केलेल्या कारवाईत एकूण एक कोटी ३१ लाखांचा ९६ किलो गांजा पोलिसांनी जप्त केला आहे. गंभीर बाब म्हणजे आरोपी हे रुग्णवाहिकेतून गांजा विक्री करत असल्याचं पोलीस तपासात समोर आलं आहे. कृष्णा मारुती शिंदे, अक्षय बारकू मोरे, हनुमंत भाऊसाहेब कदम, देवी प्रसाद उर्फ देवा सीताराम डुकळे, सन्नीदेवल सिध्दार्थ शर्मा, सन्नीदेवल भगवानदास भारती आणि सौरभ निर्मल यांना अटक करण्यात आली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या पोलीस कर्मचाऱ्यांनी रावेत पोलीस ठाण्याच्या हद्दीतून कृष्णा मारुती शिंदे, अक्षय बारकू मोरे आणि हनुमंत भाऊसाहेब कदम यांना ताब्यात घेतलं. त्यांच्याकडे अधिक चौकशी केल्यानंतर ३० लाख ५५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यात २५ लाख ३९ हजार किमतीचा २५ किलो गांजा, चारचाकी आणि चार मोबाईलचा समावेश आहे. आरोपींनी गांजा देवी प्रसाद उर्फ देवा सीताराम डुकळे यांच्याकडून आणला होता. तो सौरभ निर्मल यास विकणार असल्याचं तपासात समोर आलं आहे. त्यांच्या विरोधात रावेत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, आरोपी देवी प्रसादलाही अटक करण्यात आली आहे. त्याच्याकडून ५० लाख २० हजारांचा ५० किलो गांजा जप्त करण्यात आला आहे. आरोपी हे रुग्णवाहिकेतून गांजाची विक्री आणि डिलिव्हरी करत असल्याच तपासात समोर आले आहे. तसेच सन्नीदेवल सिध्दार्थ शर्मा आणि सन्नीदेवल भगवानदास भारती यांच्याकडून २० लाख ७९ हजारांचा २० किलो गांजा जप्त करण्यात आला आहे. असा एकूण १ कोटी ३१ लाखांचा ९६ किलो गांजा जप्त करण्यात आला आहे. हा गांजा रूपीनगर चिखलीत विकणार असल्याचं समोर आलं आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक वैभव शिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.